# प्रकरण - दुसरे

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

# प्रकरण - दुसरे

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

2.1 प्रस्तावना.

2.2 संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन.

2.3 समारोप.

# प्रकरण - दुसरे

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

### 2.1 प्रस्तावनाः

मागील प्रकरणामध्ये संशोधन विषय—पार्श्वभूमी, गरज, उपयुक्तता, महत्व, उद्दिष्टे, व्याप्ती व मर्यादा यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या संबंधित परिचित साहित्य आणि संशोधन यांचा अभ्यास केला आहे. त्याची थोडक्यात सारांशरुपाने माहिती दिलेली आहे.

### 2.2 संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचनः-

प्रस्तुत विषयाशी संशोधनात्मक अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले.

1) दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, ( 1966 - 78 ).

2) दि थर्ड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, ( 1978- 83 ).

3) 'अ क्रिटीकल स्टडी ऑफ दि प्रेझेंट पोझिशन ऑफ टिचिंग हिस्ट्री इन सेकंडरी स्कूल्स ऑफ सोलापूर डिस्ट्रिक्ट', बाय प्रोफेसर आर.एन.इंगोळे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी, गाईडेड बाय डॉ. आर.बी.देवस्थळी, मार्च 1985, डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी इन एज्युकेशन.

वरील ग्रंथांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असे संशोधन अद्यापि झाले नसल्याचे आढळून येते. म्हणून या विषयाचे संशोधन नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

परंतु शिक्षण प्रक्रियेतील इतिहास विषयाच्या अध्यापन पध्दतीच्या संदर्भात झालेल्या व प्रस्तुत संशोधन विषयाशी थोडयाफार प्रमाणात संबंधित असणाऱ्या कांही संशोधनांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. संबंधित संशोधन अहवालाची उद्दिष्टे, कार्यपध्दती, निष्कर्ष थोडक्यात पुढे दिलेले आहेत.

I) "An Investigation into the present apathy towards teaching and learning of History in Indian schools with particular reference to the Secondary Schools of Bihar". Ph.D, Education Bihar University, 1955.

"भारतीय माध्यमिक शाळेत इतिहास विषय शिकविण्यात व शिकण्यात दिसून येणाऱ्या उदासिनतेचा बिहार राज्याच्या शाळेतील विशिष्ट संदर्भातील अभ्यास".

हा संशोधन प्रकल्प बिहार विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील पीएच्.डी. या पदवीसाठी डॉ.एन्.पी. गुप्ता यांनी 1955 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट असे की, भारतीय शाळांतील इतिहास विषयाच्या अध्ययन - अध्यापनात दिसून येणाऱ्या उदासिनतेचा बिहार राज्याच्या शाळांच्या संदर्भात शोध घेणे.

**अभ्यास संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला गेला होता. या पध्दतीने आधारसामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण ह्या मूल्यमापन तंत्रांचा अवलंब केला होता. या साधनांद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अर्थ लावला गेला व त्यावरुन खालील निष्कर्ष काढले गेले.

**निष्कर्ष:**

भारतीय शाळांतील इतिहास अध्ययन - अध्यापनात दिसून येणाऱ्या उदासिनतेचे खालील घटक होते.

1) इतिहास अभ्यासक्रम अत्यंत क्लिष्ट असा होता व त्यात व्यक्तिगत अथवा

मूलभूत गरजांचा विचार केला जात नव्हता.

2) चांगल्या तऱ्हेची इतिहास विषयाची पाठ्यपुस्तके तयार करण्याची काळजी घेतली जात नव्हती.

3) विषय शिक्षक इतिहास विषय शिकविण्यात बिलकूल स्वारस्य घेत नव्हते.

4) परीक्षा ह्या अध्ययन - अध्यापन प्रक्रियेशी पूर्णपणे निगडीत असतात, परंतु दोन्हीमध्ये तफावत आढळत होती.

5) प्रश्नपध्दतीचे स्वरुप हे जुनाट व पारंपारिक असे होते.

6) अध्यापन पध्दतीमधून फक्त इतिहासातील भूतकालीन घटना वर्णन करण्यावर भर दिला जात असे.

7) राज्यांच्या शिक्षण प्रशासनात अत्यंत अपुरी अशी प्रशासकीय यंत्रणा होती. ही तोकडी अशी यंत्रणा असल्याने ह्यांचे प्रमाणात त्या त्या भागाशी अत्यंत विसंगत अशी स्थिती होती. ( 1. गुप्ता एन्.पी., 1955. )

II) "A comparative study of the Integrated and Traditional methods of Approach in Teaching of Social Studies to class VII, Department of Education, Hindu College, Moradabad. 1960.

"मुरादाबाद येथील इयत्ता 7 वी इयत्तेत निश्चित केलेल्या समाजशास्त्र अध्यापनाची पारंपरिक पध्दती व सर्व कौशल्ये एकत्रित सांधून केलेल्या अध्यापन पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास."

हा संशोधन प्रकल्प हिंदु कॉलेज, मुरादाबाद, शिक्षण विभाग, श्री.खूषदिल एम्.बी. यानी 1960 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिष्टे:**

सातव्या इयत्तेत समाजशास्त्राचे शिक्षण देण्याची पारंपरिक पध्दती व प्रायोगिक पध्दतीचा तुलनात्मक हेतूने खालील निकषावर अभ्यास करणे.

1) शिक्षणाच्या ह्या दोन वेगळया अध्यापन पध्दतींच्या काळात त्या विद्यार्थ्यांच्या वागणुकीवर व वृत्तीवर होणारे परिणाम पहाणे.

2) दोन पध्दतीपैकी श्रेष्ठ असणाऱ्या क्षेत्रांची वैशिष्टये अभ्यासणे.

3) सरावाच्या तासिकेला शिक्षकांना, संस्थाप्रमुखांना अनुभवास येणाऱ्या अडचणी पहाणे.

4) सर्वसाधारण परिस्थितीत, शिक्षणात ह्या संधीचा उपयोग व त्याच्या व्याप्तीचा पुरेपुर वापर करणे.

**संशोधन पध्दती:**

मुरादाबाद येथील दोन शाळांतील इयत्ता 7 वी च्या वर्गातील मुलांचे दोन गट प्रस्तुत शोध अभ्यासासाठी निवडले होते आणि इयत्ता 6 वी मध्ये अभ्यासलेल्या समाजशास्त्र विषयावरील अभ्यासक्रमावर केलेली चाचणी विद्यार्थ्यांना देऊन समान गुणांचे विद्यार्थी दोन्ही गटात विभागले. प्रत्येकी गटात 40 विद्यार्थी निवडण्यात आले. अध्यापनासाठी दोन्ही गटावर दोन अध्यापकांची नियुक्ती केली होती. प्रायोगिक कालावधी एक वर्षाचा ठरविला गेला होता. अध्यापनाचे घटक दोन्ही गटावर समानच ठेवण्यात आले होते. प्रायोगिक गटावर इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे तीन विषय एकत्रितरित्या शिकविण्यात आले. त्याचवेळी नियंत्रित गटावर हे तीन विषय पारंपारिक पध्दतीने स्वतंत्ररित्या शिकविण्यात आले. दोन्ही गटातील दोन पध्दतींच्या अध्यापनानंतर विद्यार्थ्यांच्या प्राविण्य कलातील फरक अजमावण्यासाठी, दोन्ही पध्दतींचे मोजमाप करण्यासाठी सात निकष लावण्यात आले. प्रयोग सत्र सुरु असतांना त्यांना निबंधवजा व वस्तुनिष्ठ चाचण्या देण्यात आल्या आणि प्रायोगिक काम संपल्यानंतर शेवटी विद्यार्थ्यांच्या मनाचा कल, दृष्टीकोन ओळखण्यासाठी अभिवृत्तीमापिकेचा वापर केला होता. तसेच पदनिश्चयन श्रेणीचा वापर करुन विद्यार्थ्यांच्या

वर्तनाविषयीचे मोजमाप विद्यार्थ्यांच्या पालकांकडून त्यांची मते अजमावून ठरविण्यात आले. तसेच समाजशास्त्र विषयांच्या शिक्षकांची मते अजमावून ठरविण्यात आले. ह्या संशोधनातील कार्यपध्दतीमधील तफावतीचा अभ्यास हा ह्यातील एकूण टक्केवारी व दिलेल्या चाचण्या वगैरेंच्या आधारे ठळकपणे करण्यात आला.

**निष्कर्ष:**

1) प्रस्तुत संशोधनावरुन असा निष्कर्ष निघतो की, ज्या गटास एकत्रित अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण दिले गेले होते त्या गटातील विद्यार्थ्यांचा पारंपारिक गटातील विद्यार्थ्यांपेक्षा गुणात्मक दृष्टीकोन हा चांगल्या प्रकारचा दिसून आला होता.

2) एकत्रित अभ्यासक्रम पध्दतीने शिकलेले प्रायोगिक गटातील विद्यार्थी पारंपारिक पध्दतीने शिकलेल्या नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांपेक्षा चौकस, सरस, परिपूर्ण असे दिसून आले.

3) विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीबाबत मुलभूत जे निकष होते त्या निकषांचे बाबतीत शिक्षक व पालक यांच्या निरीक्षणातील मतात मात्र फरक दिसून आला. पालकांच्या दृष्टीकोनातून एकत्रित शिक्षणपध्दती ही उत्तम अशी आहे, तर शिक्षकांचे दृष्टीकोनातून पारंपारिक शिक्षणपध्दती ही सरस व चांगली होती.

4) मूलतः शाळांचे मुख्याध्यापक, समाजशास्त्र शिकविणारे अध्यापक ह्यांना हा एकत्रित अभ्यासक्रम पध्दतीने शिकविण्यास व योजना आखण्यास अडचणी आल्या नाहीत. फक्त ह्यात पाठाची टांचणे तयार करण्यास शिक्षकांना जास्त श्रम घ्यावे लागले व विषयाचा अभ्यास करण्यास, तयारी करण्यास जादा वेळ खर्ची टाकावा लागला.

5) सर्वसाधारणपणे माध्यमिक शाळांची पाहणी केल्यानंतर माध्यमिक शाळांतील सर्वसाधारण परिस्थितीत ह्या एकत्रित अभ्यास पध्दतीच्या व्याप्तीबद्दल साशंकता दिसून येते. याबद्दल प्रवक्त्यांचे असे मत दिसून येते की, शिक्षकांचे अध्यापन हे त्यांच्या एकूण वैचारिक, मानसिक कुवत व त्यांचा संस्थेबद्दलचा दृष्टीकोन ह्यावर अवलंबून असतो. ( 2. खूषदिल एम.बी., 1960. )

I I) "An Inquiry into the teaching of Social Studies in the schools of Madurai and Allied problems in Thiagarajan College of Preceptors, Madurai."

"मदुराई येथील माध्यमिक शाळांमधील समाजशास्त्राचे अध्यापन व त्यागराजन् कॉलेजमधील तदनुषंगिक समस्यांचा अभ्यास."

हा संशोधन प्रकल्प त्यागराजन् कॉलेज, मदुराई येथील श्री. नारायण स्वामी यांनी 1960 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिष्टे:**

माध्यमिक शाळेतून शिकविला जाणारा समाजशास्त्र ह्या विषयाचा हेतू 1948 च्या अभ्यासक्रमातील इतिहास, भूगोल या विषयाच्या संदर्भात वेगळा कसा होता याचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

मदुराईच्या एकूण 321 शिक्षकांना प्रश्नावली देऊन त्यांचे कडून माहिती संकलित करण्यात आली. ह्यात मुख्याध्यापकांचाही समावेश आहे. तसेच समाजशास्त्राच्या वर्गाचीही पाहणी करण्यात आली. सहाय्यक शिक्षक व मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करण्यात आली आणि 1948 सालातील माध्यमिक परीक्षांतील समाजशास्त्राच्या कागदपत्रांचा, उत्तरपत्रिकेचा अभ्यास करण्यात आला व पुन्हा त्याचे विश्लेषण केले गेले.

**निष्कर्ष:**

1) समाजशास्त्राच्या अध्यापनासाठी आवश्यक अशा बाबींवर व वस्तूंसाठी खर्च करण्यास जी रक्कम उपलब्ध केली गेली होती ती फक्त 2 ते 20 टक्के अशा फरकाने उपलब्ध केली होती.

2) प्रत्येक विद्यालयासाठी वेगवेगळ्या प्रकारची पाठ्यपुस्तके व नकाशे उपलब्ध झाले होते.

3) प्रत्येक व्यवस्थापक मंडळाकडून तयार केलेल्या पाठ्यपुस्तकातील पाठयांश आशय वर्णन वेगवेगळे होते.

4) सुसज्ज अशा समाजशास्त्राच्या प्रयोगशाळांचा अभाव आढळून येत होता.

5) जाणीवपूर्वक व विशिष्ट उद्देशाने प्रेरित अशा परीक्षा पध्दती ऐवजी जुनाट अशा परीक्षा पध्दतीचा अवलंब केला जात होता.

6) समाजशास्त्र विषयाचे अध्यापन करणारे शिक्षक हे जरी प्रशिक्षित असले तरी त्यांच्या अनुभवात दोन महिने ते वीस वर्षे पर्यंतची तफावत दिसून आली. थोडक्यात त्यांची शैक्षणिक पात्रता, कार्यतत्परता, एकूण दृष्टीकोन हा परिणामकारक असे शिक्षण देण्यास फारच अपुरा पडत होता.

7) समाजशास्त्राच्या वर्गातील एकूण शैक्षणिक वातावरण आणि परिस्थिती ही अत्यंत अपुरी अशी होती.

8) शैक्षणिक साधने व आधार याबाबतच्या उपलब्धतेबद्दल व त्यांचा उपयोग ह्याबद्दलच्या निरीक्षणावरुन प्रत्यक्ष अशी रक्कम यासाठी खर्च केली जात नव्हती.

9) वाचनालयाची सोय होती पण ह्यात नियोजनाचा अभाव होता. दृश्य व बोलपटाद्वारे शिक्षणाची सोय जवळ जवळ अस्तित्वात नव्हती व त्यासाठी स्थानिक जमातीतूनही कांही मदत घेण्याचे प्रयत्न केले गेले नव्हते.

IV) "Critical study of the Present Position of teaching History in Secondary Schools of Solapur district." By Prof.R.N.Ingole, College of Education Barsi, March 1985."

'सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांतून शिकविण्यात येत असलेल्या इतिहास विषयाच्या अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास.'

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठाच्या पीएच.डी. या पदवीसाठी डॉ. इंगोळे आर.एन्., यांनी मार्च 1985 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीप्रमाणे आहेत.

1) इतिहास शिकविणाऱ्या शिक्षकांची हा विषय शिकविण्याची कितपत पारंगतता आहे याचा शोध घेणे.

2) पाचवी ते दहावी ह्या वर्गातील ह्या विषयाचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक या संदर्भात सध्याची स्थिती काय आहे ह्याचा अभ्यास करणे.

अ) इतिहास शिकविण्याची पध्दती अथवा दिशा.

ब) हा विषय शिकविण्या बाबतची साधने अथवा आधारभूत बाबी.

क) इतिहास विषय शिकविण्यास संबंधित असे सहशालेय कार्यक्रम अथवा अभ्यासपूरक कार्यक्रम.

ड) ह्या विषयासाठी वेगळी अशी वाचनालयीन सुविधा म्हणजे इतिहास मंदिर व तत्संबंधीच्या कार्यवाही.

3) सध्या शिकविल्या जाणाऱ्या इतिहास या विषयासंबंधी काय व कोणत्या सुधारणा करता येतील अथवा त्या बद्दल कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, कोणते मार्ग शोधावे लागतील या बद्दलचा अभ्यास.

**संशोधन पध्दती:**

ह्या संशोधन प्रकल्पासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला गेलेला आहे. ह्या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने खालील साधनांचा अवलंब करुन आवश्यक अशी माहिती जमा केली.

1) प्रश्नावली.

2) मुलाखती.

3) भेटी, चर्चा, अवलोकन.

प्रश्नावली ही सहा भागात तयार करुन ह्यामध्ये अभ्यासक्रम, शिकविण्याची उद्दिष्टे, अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने, शिक्षकांची तयारी, वाचनालय, इतिहास खोली, विद्यार्थ्यांचे गृहपाठ, स्वाध्याय आणि इतिहासातील मूल्यमापन इ. बाबी समाविष्ट केल्या गेल्या होत्या.

प्रश्नावली पोस्टाद्वारे सर्व इतिहास शिक्षकांना पाठविण्यात आली. तसेच सोलापूर जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून ती हाती देण्यात आली. त्यातील एकूण नव्वद प्रश्नावली पूर्णतया भरुन पाठविण्यात आल्या. त्या पोच झाल्या.

या व्यतिरिक्त एकूण 60 मुख्याध्यापकांच्या व एकूण 30 तज्ञांच्या ह्या प्रश्नावली प्रमाणेच मुलाखती घेतल्या. तसेच संशोधकाने शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांशी एकूण 20 माध्यमिक शाळांतून प्रत्यक्ष चर्चा केली. त्या एकूण 20 माध्यमिक शाळांतून इतिहासाच्या अध्यापनाची प्रत्यक्ष पाहणी करुन कोणत्या सुविधा व सवलती उपलब्ध होतात त्याची पाहणी केली. अशाप्रकारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करुन त्यांची एकूण 66 भागात विभागणी केली. ह्या विश्लेषणानंतर निष्कर्ष काढलेले आहेत.

**निष्कर्ष:**

1) सोलापूर जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतून इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी 45 टक्के शिक्षक हे अप्रशिक्षित होते. म्हणजेच इतिहास विषय परिणामकारकरित्या शिकविण्यास जी पात्रता आवश्यक आहे ती त्यांच्याकडे नव्हती.

2) इतिहास हा विषय शिकविण्याकरिता शिक्षकांची कोणत्याही प्रकारची समाधानकारक अशी पूर्वतयारी नव्हती.

3) इतिहासाची क्रमिक पुस्तके अचूक अशी नव्हती. वरिष्ठ अशा इयत्ता 8 वी, 9 वी व 10 च्या क्रमिक पुस्तकावरुन तयार केलेली स्पष्टपणे दिसून येत होती. विषयाची मांडणी योग्य अशा क्रमवारीने दिलेली नव्हती अथवा त्यांची पूर्वज्ञानाशी पूर्णपणे सांगड घातली नव्हती. व सुसंगतता राखली गेली नव्हती. कांही घटक ढोबळ तसेच विस्तृत असल्याने ते

विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीबाहेरचे ठरले होते तसेच त्यातील भाषा सुलभ व सोपी नव्हती.

4) इतिहास विषय शिकविण्याची उद्दिष्टे कांही अंशी सफल झाली असे दिसून आले.

5) बहुसंख्य शिक्षक फक्त कथन पध्दतीने इतिहास शिकवित असत. त्यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदु मानून बालकेंद्रित शिक्षण पध्दतीचा अथवा संशोधकाच्या दृष्टीने मूलभूत अशा पध्दतींचा वापर केला नाही. उदा. प्रकल्प पध्दती, आधार पध्दती.

6) कांही शिक्षक तर क्रमिक पुस्तकांचाच प्रामुख्याने वापर करीत असत. ते इतिहास पुस्तकांच्या आधारे जणू भाषा विषयाचा तास घेतल्याप्रमाणे केवळ वाचून दाखवित होते.

7) अनेक शिक्षकांनी इतिहास हा विषय शिकविण्यासाठी इतर आवश्यक अशा कोणत्याही योग्य अशा शैक्षणिक साधनांचा वापर केलेला नव्हता.

8) जवळ जवळ सर्व शाळांमधून इतिहास विषय शिकविण्यासाठी योग्य अशा साधनसुविधांची उपलब्धता नव्हती.

9) बहुतेक शाळांमधून इतिहास विषय शिकविण्यासाठी वेगळी अशी इतिहास खोली अथवा इतिहास विषयाचे स्वतंत्र वाचनालय असे नव्हते.

10) 1980 - 81 व 1981 - 82 ह्या काळात इतिहास ह्या एका विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 23 टक्के इतके होते. ( 4. डॉ. इंगोळे आर.एन्., 1985. )

V) "Teaching of Social Studies through current events and life situations in rural Primary Schools." An Experimental Approach.

'प्रचलित चालू घडामोडीतून व आजच्या सद्य:स्थितीतील प्रसंगातून खेड्यातील प्राथमिक शाळेमध्ये समाजशास्त्र विषय शिकविणे.'

हा संशोधन प्रकल्प पुणे विद्यापीठाच्या एम.एड्. या पदवीसाठी श्री. कुलकर्णी व्ही.के. यांनी 1963 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिष्टे:**

1) ह्या पध्दतीच्या अवलंबामुळे विद्यार्थ्यात ज्ञान संवर्धन होण्यास पारंपारिक पध्दतीपेक्षा जास्त फायदा झाला काय?

2) जुन्या पध्दतीपेक्षा नवीन पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना ज्ञान एकवटण्यास चांगली मदत झाली काय?

3) ही पध्दती लागू न केलेल्या विद्यार्थ्यांबरोबर नव्या पध्दतीने शिक्षण दिलेल्या विद्यार्थ्यांशी तुलना केल्यास कोणते विद्यार्थी वरचढ ठरतील? इत्यादी बाबी अजमावयाच्या होत्या.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने समाजशास्त्र विषयामध्ये समाविष्ट असणाऱ्या इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या तिन्ही विभागांचे स्वतंत्ररित्या अध्यापन न करता, क्रमिक पाठ्यपुस्तकांचा आधार न घेता आजच्या प्रचलित चालू घडामोडी, प्रसंग, राष्ट्रीय सण, राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या व इतर कार्यक्रम यामधून इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र या तीन विभागांचे एकत्रितरित्या ज्ञान व माहिती देण्याच्या हेतूतून अध्यापन केले. याचवेळी नियंत्रित गटावर पारंपारिक पध्दतीने हे तीन विषय स्वतंत्ररित्या शिकविण्यात आले. इयत्ता 5 वी च्या वर्गातील प्रत्येक गटात 40 विद्यार्थी प्रायोगिक कार्यासाठी घेतले होते. प्रायोगिक व पारंपारिक पध्दतीच्या अध्यापनासाठी समान प्रशिक्षणाचे, समान अनुभवाचे इतिहास विषय शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. प्रायोगिक पध्दतीच्या अध्यापनासाठी अनेक प्रकारच्या शैक्षणिक साधनांचा वापर केला होता. प्रायोगिक कार्य एक वर्षाचे करण्यात आले.

तसेच मूल्यमापनासाठी चार संपादन चाचण्या, विद्यार्थी प्रश्नावली व शिक्षक निरीक्षण या साधनांचा वापर केला गेला. यावरुन पुढील निष्कर्ष काढले गेले.

**निष्कर्ष:**

1) नवीन पध्दतीने दिले गेलेले ज्ञान हे पारंपारिक पध्दतीद्वारा दिल्या गेलेल्या पध्दतीपेक्षा निश्चितपणे सरस व उत्तमप्रकारे दिले गेलेले दिसून आले. प्रत्यक्ष चाचणी वरुन विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया दिसून आली.

2) ह्या नवीन पध्दतीने विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित असा नवीन दृष्टीकोन निर्माण झाला. उदा. वर्तमानपत्रांचे नियमित वाचन, संदर्भ पुस्तकांचे अधिक वाचन करणे, वर्तमानपत्रातील आवश्यक कात्रणे कापून संग्रह करणे, वर्तमानपत्रातून बातम्या देणे इत्यादि.

3) जुन्या पारंपारिक पध्दतीपेक्षा ही नवीन पध्दती सरस व अधिक परिणामकारक झाल्याची इतर मूल्यमापन साधनांवरुन दिसून आले. ( 5. कुलकर्णी व्ही.के. 1963. )

VI) "Teaching Social Studies in Secondary Schools of Uttar Pradesh." Ph.D. Education, Lucknow University, 1969.

"उत्तर प्रदेशातील माध्यमिक शाळांत शिकविण्यात येणारा समाजशास्त्राचा अभ्यास."

हा संशोधन प्रकल्प लखनौ विद्यापीठाच्या पीएच.डी., शिक्षणशास्त्र या पदवीसाठी श्रीवास्तव एन्.पी. यांनी 1969 साली पूर्ण केला.

**शोध अभ्यासाची उद्दिदष्टे:**

1) समाजशास्त्राचा अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही विषयी योग्य दृष्टीकोन, मनाचा कल व सामर्थ्य, चातुर्य वाढले आहे का हे पहाणे.

2) समाजशास्त्राचा अभ्यास केलेले विद्यार्थी हे समाजशास्त्राचा अभ्यास न केलेल्या सहाध्यायापेक्षा कसे श्रेष्ठ व सरस आहेत हे पहाणे.

**अभ्यास पध्दती:**

उत्तर प्रदेशातील आठ शैक्षणिक विभागांतील एकूण 1,147 विद्यार्थ्यांची या संदर्भात पहाणी करण्यात आली. एका विभागातील दोन शहरातील चार विद्यालये निवडण्यात आली आणि अशा प्रकारे एकूण 16 शहरातील 60 माध्यमिक शाळांतून माहिती संकलित करण्यात आली. ही माहिती, प्रश्नावली या मूल्यमापन साधनाच्या आधारे संकलित करण्यात येऊन तिचे विश्लेषण करण्यात आले.

**निष्कर्ष:**

1) समाजशास्त्राचा अभ्यास हा यशस्वी ठरला असल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थ्यात उच्च दर्जाचा प्रामाणिकपणा, विषयाची मनापासून आवड, अल्पसंख्याकांच्या हक्काच्या बाबतीत योग्य व रास्त जाणीव, लोकशाही जीवन पध्दतीस आवश्यक अशी समाजाबद्दलची सदिच्छा व बांधिलकी यांची बळकटी इत्यादि गुण अंगी बाणल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे लोकशाही व्यवस्थेमुळे नागरिकांना राज्यघटनेनुसार जे समान हक्क प्राप्त झालेले आहेत त्या बद्दल सामाजिक निकोप असा दृष्टीकोन निर्माण करण्यास व त्याबाबतची राजकीय जाण निर्माण होण्यास भरीव मदत झालेली आहे.

2) या संशोधनात भूगोल या विषयाचा विशेष उल्लेख करावा वाटतो. कारण ह्याचा वरील बाबतीत विद्यार्थ्यात योग्य भावना रुजविण्यास भरीव अशी मदत झालेली आहे.

3) इतिहासाच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यात समाजातील उच्च दर्जाचा प्रामाणिकपणा, स्वसन्मान व सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याची किती आवश्यकता आहे ह्याची जाणीव निर्माण करण्यास मात्र इतिहासाचे अध्यापन अयशस्वी झालेले आहे. कारण ह्यामध्ये शिक्षणामुळे अल्पसंख्याकांचे हक्क आणि स्वतंत्र न्यायसंस्था व लोकांच्या सदिच्छा ह्या लोकशाही शासनात अत्यंत आवश्यक असतात ही भावना रुजविली गेली नाही. ( 6. श्रीवास्तव एन्.पी., 1969 . )

## 2.3 समारोप:

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या संबंधित अशा साहित्याचा सारांश रुपाने अभ्यास करीत असतांना प्रत्यक्ष कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने एकही संशोधन झालेले आढळले नाही. मात्र शिक्षण प्रक्रियेतील इतिहास विषयाच्या अध्यापन पध्दतीच्या संदर्भात कांही संशोधने झालेली आढळली ती अशी :- 1955 साली डॉ. गुप्ता यानी पीएच.डी.पदवीसाठी बिहार राज्यातील भारतीय माध्यमिक शाळेत इतिहास विषय शिकविण्यात आणि शिकण्यात दिसून येणाऱ्या उदासिनतेचा बिहार राज्याच्या शाळेतील विशिष्ट संदर्भात शोध प्रबंध बिहार विद्यापीठास सादर केला आहे. डॉ. खूषदिल यानी 1960 मध्ये मुरादाबाद येथील इयत्ता 7 वी च्या इयत्तेसाठी निश्चित केलेल्या समाजशास्त्र अध्यापनाची पारंपारिक पध्दती व सर्व कौशल्ये एकत्रित सांधून केलेल्या अध्यापन पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. तसेच श्री. नारायण स्वामी यांनी 1960 मध्येच मदुराई [illegible] माध्यमिक शाळेतील समाजशास्त्राच्या अध्यापनातील समस्यांचा अभ्यास केलेला आहे तसेच 1985 मध्ये डॉ. इंगोळे यांनी पीएच.डी. पदवीसाठी सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांतून शिकविण्यात येत असलेल्या इतिहास विषयाच्या अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे आणि 1963 मध्ये श्री. कुलकर्णी व्ही.के. यांनी एम्.एड्. पदवीसाठी प्रचलित चालू घडामोडीतून व आजच्या सद्य:स्थितीतील प्रसंगातून खेड्यातील प्राथमिक शाळेमध्ये समाजशास्त्र विषय शिकविण्यात होणारा फरक पहाण्यासाठी तुलनात्मक प्रायोगिक अभ्यास केला आहे.

वरील संबंधित संशोधनांची प्रत्येकी उद्दिष्टे, कार्यपध्दती, व निष्कर्ष यांचे वर्णन केलेले आहे. यांच्या अभ्यासावरुन प्रस्तुत संशोधिकेस निश्चित मार्गदर्शन लाभलेले आहे.

----